# शब्द

ना.रा.वडनप

IRBK-0127326

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्रं. २७३२८ नों. दि २०।१२।९६
वि. .. बा.वा. ... क्र. ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

सूचना खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

12 2 FEB 1997
12 3 DEC 1997
2 5 NOV 2000
[illegible]
2 7 JUL 2001
1 3 AUG 2001

(कृ.मा.पहा.)
१६०००/११-९५

■ प्रकाशक
सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ,
पुणे.

■ अक्षरजुळणी
इफेक्टस्,
६बी/२१, आयडिअल कॉलनी,
कोथरूड, पुणे.

■ मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.,
कोथरूड,
पुणे.

■ © ना. रा. वडनप
फ्लॅट सी, ३/११,
रक्षालेखा सोसायटी,
गजेंद्रनगर, (दत्तवाडी), पुणे.

■ मुखपृष्ठ
बाबू उडुपी

■ प्रथमावृत्ती
ऑगस्ट, १९९४

■ किंमत
पंचवीस रुपये

■ ISBN 81-7161-372-1

विविध शब्दसमस्यांच्या पुस्तकांसाठी
ज्यांनी मदत केली,
ते आमचे स्नेही व त्यांच्या पत्नी -
**श्री. श्रीधर फडके**
व
**सौ. नीला फडके**
यांना सप्रेम अर्पण

# प्र स्ता व ना

सुट्टी म्हणजे मुलांना भरपूर वेळ असतो. मुले मनमुराद खेळत असतात. डोंगरावर भटकतात, सहलीला जातात, त्याचप्रमाणे विविध उपक्रमांत भाग घेतात आणि निसर्गात रमून जातात. पण हे सर्व घराबाहेर शक्य होते. घरी आल्यावर मात्र वेळ कसा घालवायचा, हा प्रश्नच असतो. दुपारी वडीलधारी माणसे विश्रांती घेतात, झोपी जातात. मुलांनी गडबड, गोंधळ, आरडाओरड केलेली त्यांना बिलकुल खपत नाही. अगदी तोंडावर बोट, हाताची घडी, असे गप्प बसावे, असे मोठ्यांना वाटते. पण हे शक्य होत नाही. ज्या वयात मुलांना ओरडावे, हसावे, खेळावे वाटते, त्या वयात ह्या मुलांना तोंडावर बोट, हाताची घडी घालून बसा, हे सांगणे म्हणजे त्यांच्यावर जबरदस्ती केल्यासारखे होईल. कारण कोणताही खेळ खेळताना थोडासा आवाज हा होणारच. तरी विश्रांतीत व्यत्यय नको, म्हणून गोष्टी ऐकण्याचा कार्यक्रम करतात. पुस्तके वाचतात. तर अशा वेळी आणखी काही कार्यक्रम मिळाला, तर त्यांना हवा असतो. श्री ना.रा. वडनप ह्यांनी एक आगळे पुस्तक लिहिले आहे- ज्यामध्ये, वैचित्र्यपूर्ण विपुल शब्दसमस्या रचलेल्या आहेत. हा सर्व विविध प्रकार काव्यात गुंफलेला आहे. त्यांची उत्तरे मुलांनी शोधायची आहेत.

श्री. वडनप ह्यांनी, बुद्धिबळे हा खेळ समजावा, म्हणून बरीच पुस्तके लिहिली आहेत. त्याचप्रमाणे विपुल शब्दसमस्यांचीही सुंदर पुस्तके लिहिली आहेत. काही ठिकाणी क्लिष्टता येणे संभवनीय आहे; पण रचना सहज-सोपी आहे. शब्दांच्या कसरती आहेत. लय आहे. त्यामुळे मुलांच्या विचाराला खाद्य मिळेल व शब्दभांडारही वाढेल. खेळ खेळता खेळता आनंद तर होईलच, शिवाय शब्दांची ओळख, त्यांचा वापर, त्यांचा साठा विस्तार पावेल. असा हा उपक्रम दिसावयास सोपा वाटला, तरी विचार करावयास लावणारा आहे. अशा प्रकारे विविध आणि विपुल

शब्दसमस्या रचलेल्या आहेत. कधी चार ओळींची, तर कधी दोन ओळींची सुद्धा रचना आहे. वैविध्याने युक्त असे अनेक प्रकार रचले आहेत. एक नवीन प्रकार मुलांच्या हाती दिल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

माहेर, १२०५/३/८,शिवाजीनगर, **श्रीधर राजगुरू**
पुणे ४११००४
२३-८-८४

# हि त गू ज

विविध शब्दसमस्या म्हणजे सान-थोरांसाठी असणारी विधायक करमणूक होय.

ह्या शब्दसमस्या सर्वप्रथम मला सुचल्या १९८१च्या आमच्या गोव्याच्या सहलीत. सर्व सहप्रवाशांना वेळ घालविण्याचे शब्दखेळ हे हुकमी साधन ठरले होते. पुढे अशा शब्दसमस्या तयार करण्याचा मला छंदच लागला; त्यातूनच एक हजार विविध शब्दसमस्या तयार केल्या व त्यांचे हस्तलिखित तयार केले. ह्या शब्दसमस्यांचे प्रात्यक्षिक घेण्यासाठी लहान मुलांचे दोन दोन गट केले व शहरांच्या किंवा कवितांच्या भेंड्यांप्रमाणे ह्या शब्दसमस्या सांगितल्या. त्यात भाग घेणाऱ्या मुलांनी व त्यांच्या पालकांनी ह्या शब्दसमस्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा खास आग्रह केला. विशेष उल्लेखनीय बाब, म्हणजे 'आकाशवाणी' पुणे केंद्रावरून ता. ३/१/१९९३ रोजी दु. ३ वाजता 'बालोद्यान' मध्ये या शब्दखेळांचा कार्यक्रम प्रसारित करण्यात आला होता.

दरम्यान यामधील बऱ्याच शब्दसमस्या, शब्दखेळ, शब्दकोडी, शब्दकसरत वगैरे मथळ्यांखाली दै. सकाळ, सायंसकाळ, साप्ताहिक सकाळ, तरुण भारत (पुणे) यांमध्ये छापून आलेल्या आहेत, त्याबद्दल मी सकाळ, साप्ताहिक सकाळ, तरुण भारत यांच्या संपादकांचा अत्यंत आभारी आहे.

१९८४च्या सुमारास ह्या शब्दसमस्यांचे हस्तलिखित श्री. श्रीधर राजगुरू यांच्याकडे दिले व त्यांना प्रस्तावना लिहून देण्याची विनंती केली. ती त्यांनी मान्य करून प्रस्तावना लिहून दिली. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. शब्दसमस्यांचा पुस्तकरूपाने प्रसिद्धीचा योग मात्र आता येत आहे.

ह्या शब्दसमस्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याच्या अगोदर त्या सर्व निर्दोष असाव्यात, ह्या हेतूने १००० शब्दसमस्यांचे हस्तलिखित मी, श्री. श्रीधर फडके व त्यांच्या पत्नी सौ. नीला फडके यांच्याकडे दिले. त्यांनी ते तपासून अत्यंत मौलिक सूचना केल्या व काही चुका माझ्या निदर्शनास आणल्या. काही ठिकाणी अर्थवाही पर्यायही सुचविले. तसेच, हे सारे पुस्तकरूपाने छापण्याचे ठरल्यावर त्यांची मुद्रितेही काळजीपूर्वक तपासून, त्यांमध्ये नेटकेपणा आणण्यास बहुमोल मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

दरम्यान एक हजार शब्दसमस्या एकाच पुस्तकात छापण्याऐवजी त्यांतील २५०, २५० शब्द समस्यांची वेगवेगळी चार पुस्तके करण्याचे ठरले; व ही चार पुस्तके म्हणजे (१) शब्दखेळ, (२) शब्दकोडी, (३) शब्दकसरत आणि (४) शब्दकरमणूक ही होत. ह्या चारही पुस्तकांमधील प्रकरण एक समाईक आहे. या पहिल्या प्रकरणात सुरुवातीला या विविध शब्दसमस्यांचे प्रयोजन सांगून, त्यानंतर शब्दसमस्यांचे अकरा वेगवेगळे प्रकार दिले आहेत. प्रत्येक प्रकाराच्या आरंभी तो तो प्रकार कसा गुंफला आहे, याची माहिती थोडक्यात देऊन, त्या त्या प्रकारासाठी दोन, दोन उदाहरणे दिली आहेत. व त्यांची उत्तरे या पहिल्या प्रकरणाशेवटी दिली आहेत.

वरील प्रत्येक पुस्तकाच्या प्रकरण दोनमध्ये प्रत्येकी २५०, २५० शब्दसमस्या (१) शब्दखेळ, (२) शब्दकोडी, (३) शब्दकसरत व (४) शब्दकरमणूक असे देऊन त्यांची उत्तरेही त्या त्या पुस्तकाशेवटी दिली आहेत.

मुलांच्या मनोरंजनासाठी, ही करमणूकप्रधान पुस्तके उपयुक्त ठरतील, यात काही शंका नाही. ह्या सर्व पुस्तकांकडे केवळ विधायक करमणूक, निर्भेळ आनंद मिळवणे ह्या दृष्टिकोनातून पाहावे. ह्यांमधील शब्दसमस्या लयबद्ध असल्याने त्या पद्यमय वाटतात, तरी त्यांना कवितांचे नियम लावलेले नाहीत, तसेच, ऱ्हस्व, दीर्घ झालेले काही शब्द असतील. तेव्हा हे सारे व्याकरणशुद्ध असेलच, असे नाही. परंतु त्यातून निर्भेळ मौज, मजा सान-थोरांना मिळेल, यात काही शंका नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता आणि त्यांचे सुपुत्र सुनील मेहता यांनी (१) शब्दखेळ, (२) शब्दकोडी, (३) शब्दकसरत व (४) शब्दकरमणूक ही चारही पुस्तके प्रकाशित करण्याचे मान्य केले व ती प्रसिद्ध केली याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या चारही पुस्तकांचे संगणक-संचाद्वारे अक्षरजुळणीचे काम करणाऱ्या सौ. मानसी सोवनी, इफेक्टस् टाईपसेटिंग, यांचे मी आभार मानतो. पुस्तकांचे उत्कृष्ट मुद्रण करून, मेहता पब्लिशिंग हाऊसमधील सर्वांनी उत्तम सहकार्य दिले, त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

पुस्तक छापण्याविषयी खास आग्रह धरणाऱ्या छोट्या बालमित्रांचे व त्यांच्या पालकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

श्री गजाननाच्या कृपेने मी थोडेबहुत लेखन करू शकलो, तसेच, या एक हजार शब्दसमस्यांशिवाय आणखी पाचशे शब्दसमस्या मी तयार केल्या आहेत. त्याही पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा मानस आहे.

या पुस्तकामध्ये काही दोष आढळल्यास, विद्वानांनी लेखकाच्या निदर्शनास आणावेत, ही नम्र विनंती.

**ना.रा. वडनप**

फ्लॅट सी ३/११,
रक्षालेखा सोसायटी,
गजेंद्रनगर, (दत्तवाडी),
पुणे ४११०३०.

प्रकरण - १

# शब्द कसरत

सुट्टी म्हणजे मुलांना असते, खेळाची पर्वणी
गोड गोड पदार्थांची, त्यांना मिळते मेजवानी॥
त्यांच्यापाठी नसतो अभ्यासाचा लकडा
बाहेर तसाच घरांत, दंगा चालतो त्यांचा॥
रस्त्यावरील रहदारीने, होतो त्यांचा खोळंबा
खेळतांना त्यांना म्हणावे लागते, थांबा, थांबा!
परंतु रहदारी वाढते आणि खेळ थांबविते
नाईलाजाने मुलांना, घरांत यावे लागते॥
बैठे खेळ खेळू लागतात ती मग घरांत
सापशिडी, कॅरम, पत्ते, बुद्धिबळे, खेळतात॥
वृद्ध आणि निवृत्त लोक त्यांच्यात भाग घेतात
तेच ते खेळ खेळून त्यांचे मन नाही रमत??
सहल संमेलनातील मंडळींना ह्वे असते मनोरंजन
सर्वांना ह्वा असतो गमती जमतीचा खेळ नवीन!!
अशांसाठी शोधला आहे नवा प्रकार खेळाचा
सान थोरांचा तो होईल खूप खूप आवडीचा॥
"शब्द कसरत"चा आहे खेळाचा नवा प्रकार
सांगतो मी त्यांचे खास अकरा विविध प्रकार॥

**विशेष सूचना**

**प्रथम शब्द कसरत क्रमांक दिले आहेत त्यापुढे (प), (दु), (ति), वगैरे अक्षरे लिहिली आहेत; ही अक्षरे ती शब्द कसरत कोणत्या प्रकारात असेल हे दर्शविले आहे.**

**प्रकरण दोन मध्ये संकीर्ण शब्द कसरती दिल्या आहेत.**

**शेवटी शब्द कसरतींची उत्तरे दिली आहेत.**

*सुरम्य फुलांची पाखरं*
*पकडू पाहतात सान थोर*
*करतात मधुशब्द गोळा*
*गमत्या "नाना" रंगाचा सोहळा!!*

**प्रकार - पहिला (प)**

वस्तू, कीटक वा शब्द आहे
ओळखा बरे नेमके काय आहे?

**(१) (प)**

अंगभर छिद्रे असून कसे
पाणी आंत जमून बसे?!
दोन अक्षरी आहे शब्द
ओळखा तो बसू नका स्तब्ध!?

**(२) (प)**

एक जीव असा आहे
अजरामर तो सदा राही?
शब्द आहे चार अक्षरी
सांगा शब्द सत्वरी!!

## प्रकार दुसरा (दु)

निम्मे, अर्धे सांगितले आहे।
सबंध शब्दाचा अर्थ दिला आहे.
ओळखा शब्द कोणता आहे?

(१) (दु)
निम्मे घेता नी हातात धरता
निम्मे घेऊन हातात घालता
सबंध घेऊन उठवून टाकता
सहा अक्षरी शब्द
ओळखा कोणता??

(२) (दु)
आहे 'र व' निम्मा घेता
निम्मा घेऊन पेचात पडता
आहे समस्या सबंध घेता
चार अक्षरी शब्द
ओळखा आता!?

## प्रकार - तिसरा (ति)

अर्धा शब्द दिला आहे।
अर्ध्याचा शब्दार्थ दिला आहे
संपूर्ण शब्दाचा अर्थ दिला आहे।
ओळखा मूळ शब्द कोणता आहे?

(१) (ति)
'रोख' ढळता 'मार' बसतो
'मार' बसता 'रोख' उरतो
स्वच्छ सरळ अर्थाचा आहे शब्द
ओळखा कोणता आहे शब्द??

(२) (ति)
'वळ' काढता, लागे 'खूळ'
'खूळ' काढता, उठे 'वळ'
योजतात शब्द आंदोलन होता
ओळखा शब्द आहे कोणता??

### प्रकार - चवथा (च)

उलट सुलट वाचला जरी
अर्थ बदलत नाही तरी!
उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून!!

(१) (च)

उलट सुलट वाचला जरी
नाही अर्थ बदले तरी
लांछन अर्थ व्यक्त करी
शोधा शब्द सत्वरी!!

(२) (च)

उलट सुलट वाचून पहा
मूल्य त्याचे वाढे महा
पारखून तुम्ही त्याला आगीत
अंगावर मिरवता सारे
खुशीत!!

### प्रकार - पाचवा (पा)

शिर म्हणजे पहिले अक्षर।
पोट म्हणजे मधले अक्षर।
पाय म्हणजे शेवटले अक्षर।
समस्या ओळखा तुम्ही सत्वर॥

(१) (पा)

शिर कापता, रमे छान
पोट फोडता, निघे अन्न!
पाय तोडता, ओझे मान
होई मिळुनी देश महान!!

(२) (पा)

शिर तोडता कवि मोठे
पोट फोडता, मारी धोंडि!
डोईवरती आहे गाय
आडनाव सांगा आहे काय??

## प्रकार - सहावा (स)

अर्थ सूचीत केलेला आहे मूळ शब्दाचा
सूचीत अर्थातून मूळ शब्द ओळखा!?

**(१) (स)**

हक एका शब्दात आहे
नाक 'उगाच' खुपसू पाहे
शब्द आहे चार अक्षरी
ओळखा शब्द सत्वरी!?

**(२) (स)**

एक कला अशी आहे
गती देताच भांडू लागे!
चार अक्षरी भांडखोर शब्द
ओळखा बखेड्याचा शब्द??

## प्रकार - सातवा (सा)

दिले आहेत विरोधाभासाचे शब्द
अर्थ उमजून त्यांचे, ओळखा मूळ शब्द॥

**(१) (सा)**

अंती असूनही शब्द 'गार'
मूळ शब्द देतो चटका फार!
शब्द आहे तीन अक्षरी
ओळखा शब्द तुम्ही सत्वरी॥

**(२) (सा)**

एक सुख असे आहे
तोंडी लागताच नकोसे वाटे!
चार अक्षरी आहे शब्द
शोधा तो भडीमाराचा शब्द!?

## प्रकार - आठवा (आ)

मूळ शब्दाच्या दोन तुकड्यांना दिलेत प्रतिशब्द
प्रतिशब्दांतून काढा ओळखून तो मूळ शब्द !!

(१) (आ)
एक 'बोट' अशी आहे
ती 'विहिरीवरच बसते ??
शब्द आहे चार अक्षरी
ओळखा शब्द सत्वरी !!

(२) (आ)
न्यायालयीन बाब आहे
डोके मात्र त्याला लागते !
शब्द आहे पाच अक्षरी
ओळखा शब्द तुम्ही सत्वरी !!

## प्रकार - नववा (न)

वाढीव शब्द ओळखा कोणता ?

(१) (न)
एक घर रहा म्हणते
दुसरे लागताच जा म्हणते !!
प्राणीमात्रांची आहे ती अंतीम अवस्था
चार अक्षरी शब्द ओळखा आता ??

(२) (न)
दाखवी एक शब्द, अंश
दुसरा लागताच तापाचा दंश !!
ताप पाहून होऊ नका क्षुब्ध
ओळखा पाहू चार अक्षरी शब्द !?

## प्रकार - दहावा (द)

शब्द एका शब्दात आहे। त्याचा अर्थ व्यक्त केला आहे
मूळ शब्दाचे वर्णन केले आहे। ओळखा मूळ शब्द कोणता आहे??

(१) (द)

'लाट' शब्दात आहे
ओघ विचाराची ती उलटवते!
सुनीतामध्ये ती व्यक्त होई
ओळखा शब्द नाही घाई!!

(२) (द)

'टांग' शब्दात आहे
साष्टांग नमस्कार घालायला लावते
सुरूला तांब्यादर्शक आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द!!

## प्रकार - अकरावा (अ)

### काव्य-समस्या (कोडे)

गुंफले कवितेत छोटे कोडे
उलगडते का पहा गडे!!

(१) (अ)

तीन अक्षरी शब्द द्व्यर्थी
रक्षक किंवा आहे भाजी!
दोन अक्षरे घेता पहिली
सरपटणारा प्राणी होई!
अक्षर मधले ते गाळुनी
तुम्ही करता त्यात मिठाई!!
शोधून काढा शब्द द्व्यर्थी
रचुनी तुम्ही कविता नामी!!

## शब्द कसरत प्रकरण एकची उत्तरे

प्रकार - पहिला : (१) स्पंज, (२) चिरंजीव

प्रकार - दुसरा : (१) उचलबांगडी, (२) शब्द कोडे

प्रकार - तिसरा : (१) रोखठोक, (२) चळवळ

प्रकार - चवथा : (१) कलंक, (२) कनक

प्रकार - पाचवा : (१) भारत, (२) गोगटे

प्रकार - सहावा : (१) हक्नाक, (२) कलागती

प्रकार - सातवा : (१) अंगार, (२) तोंडसूख

प्रकार - आठवा : (१) आडनाव, (२) कायदेशीर

प्रकार - नववा : (१) घरघर, (२) कणकण

प्रकार - दहावा : (१) कलाटणी, (२) लोटांगण

प्रकार - अकरावा

'पालक' आहे शब्द द्व्यर्थी
रक्षक किंवा आहे भाजी!
दोन अक्षरे घेता पहिली
'पाल' शब्दी प्राणी होई!!
मधले अक्षर जाता राही
'पाक' लागे करावया मिठाई!!
सोपा आहे शब्द द्व्यर्थी
कविता आहे त्याहून नामी!!

# प्रकरण - २

## शब्द कसरत (संकीर्ण)

(१) (दो)

निम्मे घेता, शिक्षा आहे
निम्मे घेता, वृक्ष आहे
आरास आहे सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(२) (दु)

निम्मे घेता, पक्व आहे
निम्मे घेता, पर्ण आहे,
वृद्धावस्था आहे, सबंध घेता
पाच अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(३) (पा)

अद्याक्षराविना म्हातारपण थोडेसे
मध्याक्षराविना शेतीसंबंधी शब्द असे!
अंत्याक्षराविना श्रृंगाराचा भाव दिसे
तीन अक्षरी शब्द काय असे?

(४) (चा)

उलट सुलट वाचले तरीही तेच
पुढील वाक्यातील उलगडा पेच
''नासर म्हणतो 'पेय' द्या''
नऊ अक्षरी वाक्य तुम्ही शोधा!

(५) (द)

रान एका शब्दांत असूनही
अरण्य मात्र त्यात नाही
पोटातील पाचक अग्निदर्शक आहे शब्द
ओळखा पाच अक्षरी तो शब्द ?

(६) (द)

हिव एका शब्दात असूनही
थंडी मात्र त्यात नाही
उमाळा निदर्शक आहे तो शब्द
ओळखा तो चार अक्षरी शब्द ?

(७) (दु)

निम्मे घेता टिंगल आहे
निम्मे घेता फळ आहे
साल आहे, सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता ?

(८) (दु)

निम्मे घेता राजधानीचे गाव आहे
निम्मे घेता सुखकारक आहे
रोमांचकारी आहे सबंध घेता
पाच अक्षरी शब्द ओळखा कोणता ?

(९) (दु)

दाह एका शब्दात असूनही
आगाग मात्र होत नाही
अंती युद्ध पेटत असता
कित्ता त्याचा गिरवा का म्हणता ?

(१०) (पा)

शिर नसता मूल आहे
पोट नसता वहीम आहे
नाव आहे नसता पाय
हेळसांड दर्शक आहे काय ?

(११) (पा)

शिर घेता प्रश्न पडतो
पोट नसता तिरळा दिसतो
कार्य आहे नसता पाय
इच्छा दर्शक आहे काय ?

(१२) (द)

'बहु' एका शब्दांत असूनही
खूप मात्र व्यक्त होत नाही
परंतु ऐवजी आहे तो शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द ?

(१३) (द)

'चिरा' एका शब्दांत असूनही
भिंतीचा दगड मात्र तो नाही
समूळ नाशाचा आहे तो शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द ?

(१४) (दु)

निम्मे घेऊन जागे व्हा म्हणता
निम्मे घेऊन पैसा अडका म्हणता
चांभार चौकशी करता सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता ?

(१५) (दु)

निम्मे घेता, तिरळा म्हणता
निम्मे घेता, नयन म्हणता
सबंध घेऊन दुर्लक्ष करता
चार अक्षरी शब्द आहे कोणता ?

(१६) (द)

'रस' शब्दात असूनही
फळा संबंधी मात्र नाही
शंका फेडणे संबंधीचा शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द ?

(१७) (पा)

शिर नसता नरडे आहे
पोट नसता समय आहे
गति आहे नसता पाय
निराळा अर्थी आहे काय ?

(१८) (पा)

शिर नसता शंकर आहे
पोट नसता बाण आहे
राजावर हल्ला आहे नसता पाय
नगराला म्हणतात काय ?

(१९) (द)

'खाव' एका शब्दात असूनही
खाण्यासाठी मात्र त्यात काही नाही
सौख्यकारक आहे तो शब्द
ओळखा चार अक्षरी तो शब्द ?

(२०) (द)

कला आहे एका शब्दात
विडंबनाचा आविष्कार दिसतो त्यात
हुबेहूबपणाचा आणतो तो भाव
पाच अक्षरी ओळखा त्याचे नांव

(२१) (दु)

माराची खूण आहे निम्मे घेता
कंबर आहे, निम्मे घेता
सबंध घेऊन बिछाना गुंडाळला म्हणता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(२२) (दु)

पूर्वार्धात आहे गोधन
उत्तरार्धात आहे वन
कुरण अर्थी शब्द संबंध शब्द
सांगा चार अक्षरी शब्द

(२३) (चा)

अद्याक्षराविना निरखून बघता
मध्याक्षराविना कावळा म्हणतात
अंत्याक्षराविना कापा म्हणता
तीन अक्षरी शब्द ओळखा आता

(२४) (पा)

शिर नसता आंस आहे
पोट नसता हरभरा आहे
का हळहळता नसता पाय
तिरळा दर्शक शब्दाला म्हणतात काय?

(२५) (पा)

शिर नसता, किल्ला आहे
पोट नसता, अश्रुपात आहे
जोर आहे, नसता पाय
भरपूर अर्थी शब्द आहे काय?

(२६) (दु)

नारळापासून बनतो, निम्मे घेता
कोडे आहे, निम्मे घेता
शुष्क गप्पा आहेत सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(२७) (द)

'तप' एका शब्दात असूनही
बारा वर्षांचे मात्र ते नाही
अंती प्रतिष्ठादर्शक आहे. शब्द
ओळखा चार अक्षरी रेंगाळणारा शब्द?

(२८) (द)

'कलां' एका शब्दात असूनही
चंद्राची मात्र ती नाही
गलितगात्र दर्शक आहे तो शब्द
ओळखा चार अक्षरी तो शब्द?

(२९) (प)

एक 'बटा' अशी आहे की
'टाटा' करीत 'कीस' देते ती!
खाण्याचा पदार्थ आहे तो
पाच अक्षरी शब्द ओळखा तो?

(३०) (दु)
कर आहेत, निम्मे घेता
वारे आहेत, निम्मे घेता
हावभाव आहेत सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(३१) (पा)
शिर घेऊन, गा म्हणता
'ग'ची बाधा होते, पोट धरता
पोट नसता गाणे का गाता
ओरडणे असे त्याला का म्हणता?

(३२) (चा)
उलट सुलट वाचला जरी
अर्थ बदलत नाही तरी
सरासरी दर्शक आहे शब्द
ओळखा तो बसू नका स्तब्ध?

(३३) (पा)
शिर नसता पथक आहे
पोट नसता सामर्थ्य आहे
खोट्या पैशाचा नाद, नसता पाय
पालट दर्शक शब्द आहे काय?

(३४) (दु)
भिति आहे निम्मे घेता
रंग आहे निम्मे घेता
वाघोबाचे ओरडणे आहे सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता.

(३५) (पा)

शिर नसता 'टीका' आहे
पोट नसता 'तारका' आहेत
वाजे वाजंत्री नसता पाय
तीन अक्षरी शब्द आहेत काय ?

(३६) (स)

एक कावा असा आहे
हेल काढताच तो हलतो
शब्द आहे चार अक्षरी
ओळखा तो सत्वरी ?

(३७) (सा)

अद्याक्षराविना तडा काचेवरचा
अत्यांक्षराविना प्रियकर देवयानीचा
मध्याक्षराविना कृतीची आज्ञा
टाकाऊ वस्तूंची शोधा संज्ञा

(३८) (आ)

निम्मे घेता समूहदर्शक आहे
निम्मे घेता चित्त अर्थी आहे
घड्याळ त्यावर शोभून दिसे
चार अक्षरी शब्द काय असे ?

(३९) (न) .

एक शब्द म्हणजे मनाची आवड
दुसरा लागताच पक्षांचा किलबिलाट ?

(४०) (द)

पदी शब्दात असूनही
पायाशी संबंधित नाही
वारंवार दर्शक आहे तो शब्द
ओळखा चार अक्षरी तो शब्द

(४१) (द)

लप एका शब्दात असूनही
लपंडावाचा खेळ मात्र नाही
सुरुला 'वृथा' नि अंती 'कापड' आहे
शब्द सालपटाचा काय आहे?

(४२) (प)

नन शब्दात असूनही
धर्म प्रचारिका मात्र नाही
सुरुला लोक अर्थी आहे शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द

(४३) (दु)

निम्मे घेता कात्री आहे
निम्मे घेता समय आहे
होते संध्याकाळ सबंध घेता
पाच अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(४४) (ति)

चार अक्षरांमधला 'मर' काढून टाकता
'स' 'स' चा निश्वास तुम्ही सोडता
पण 'मर' तस्साच माघारी बसवता
तुम्ही त्यात एकरूप कसे काय होता?

(४५) (दु)

सुरूला रजनी, अंती राणीचा शब्द
संबंध आहे चार अक्षरी शब्द
सुगंध पसरविते मंद मंद
पहाटेच्या सुवासाने होती धुंद धुंद !!

(४६) (दु)

आगीचा लोळ आहे निम्मे घेता
देवीला सोडलेला बैल, निम्मे घेता
दंगलीत अडकला सबंध शब्द
शोधा तो बसू नका स्तब्ध

(४७) (पा)

शिर नसता घोटाळा आहे
पोट नसता रंग आहे
नदी आहे नसता पाय
तीन अक्षरी शब्द आहे काय

(४८) (पा)

आहेत मोठी शिर नसता
टाकता अडचणीत पोट नसता
फुटतो अंकूर नसता पाय
पक्षाचे नाव आहे काय ?

(४९) (स)

आहे अशी एक 'नन' की
रानावनात राहाते ती
सुरूला कर्ण अर्थी शब्द आहे
ओळखा तीन अक्षरी शब्द कोणता आहे ?

(५०) (सा)

एका शब्दात असूनही 'गाऊ'
ऐकण्यासाठी कान नका देऊ
कान देता म्हणेल तो घरू.
तीन अक्षरी शब्द ओळखा पाहू?

(५१) (आ)

एक थरकाप असा आहे
की, जमीन हादरून भेगा पाडते
शब्द आहे पाच अक्षरी
पाचावर धारण बसते सत्वरी?

(५२) (ना)

एक शब्द म्हणजे मोठे प्रस्थ
दुसरे लागताच बोलण्याने होता त्रस्त??

(५३) (द)

'जाग' एका शब्दात असूनही
निद्रिस्त मात्र नाही
बावळट अर्थी आहे तो शब्द
ओळखा चार अक्षरी तो शब्द?

(५४) (द)

'खाण' आहे एका शब्दात
प्रशंसेचे उत्पादन होते त्यात
प्रारंभी आहे परंतु दर्शक शब्द
ओळखा तो चार अक्षरी वाहवाचा शब्द?

(५५) (प)

एक 'वड' शब्दात आहे असा
किरणांमध्ये लपून बसलाय जसा!
पानांआडून लपंडाव खेळतो असा
चार अक्षरी शब्द असेल कसा?

(५६) (दु)

निम्मे घेता, अमृत आहे
निम्मे घेता; हात आहे
सबंध घेता आहे नाव नायकाचे
एकच प्याल्यातील वादळात सापडणाऱ्याचे!

(५७) (च)

उलट सुलट वाचून पहा
खायचा पदार्थ चविष्ट महा!
उलट सुलट तळून खाता
खमंग शब्द तो तुम्ही अेळखा?

(५८) (पा)

शिर नसता मृत्यूपाश आवळणारा
पोट नसता कार्यात रमणारा
प्रश्न आहे नसता पाय
ओळखा शब्द आहे काय?

(५९) (पा)

शिर नसता, शिजण्याचा नाद
पोट नसता, किल्ल्याची भिंत
आहे सर्वनाम, नसता पाय
गोणपाटाला मग म्हणतात काय?

(६०) (न)

एक 'शब्द' आहे परमेश्वराचा
दुजा लागताच घोष शंकराचा
लढाईत अवसान चढविणारा आहे
ओळखा शब्द कोणता आहे?

(६१) (द)

'रास' एका शब्दात असूनही,
ढीग वा नक्षत्रांसाठीचा तो नाही
सुरुला मोर आहे, अंती नकार आहे
योगासनाचा शब्द काय आहे?

(६२) (द)

'आच' आहे एका शब्दात
भात शिजवण्याचा आवाज त्यात
खुळचट म्हणता त्याला तुम्ही
ओळखा शब्द नाही घाई?

(६३) (द)

'मिरू' एका शब्दात असूनही
मित्रेपणा मात्र त्यात नाही
अंती चव दर्शक आहे शब्द
ओळखा तो आवडीचा शब्द?

(६४) (प)

चार अक्षरांमध्ये बसलेली 'बनी' बाहेर काढता
'स' 'स' चा सुस्कारा तुम्ही का सोडता?
'बनी' तश्शीच चार अक्षरांत परत ठेवता
तिच्या आडनावाने का हाका मारता?

(६५) (दु)

तळ नसता यान आहे
यान नसता तळ आहे
सबंध घेता अड्डा आहे
शब्द ओळखा कोणता आहे?

(६६) (पा)

शिर नसता, युद्ध म्हणता
पोट नसता, ठेवण म्हणता
चालत रहाता नसता पाय
पायांना तुम्ही म्हणता काय?

(६७) (पा)

शिर नसता, शरीर राही
पोट नसता, लोक शाही!
गावाचे नाव आहे, नसता पाय
सांभाळून ठेवण्याचा शब्द आहे काय?

(६८) (पा)

शिर नसता, मृत्यू आहे
पोट नसता, सहज आहे
सच्छिल आहे नसता पाय
दक्षतेचा शब्द आहे काय?

(६९) (द)

'फट' एका शब्दात असूनही
चीर अर्थी मात्र तो नाही
'अडकून बसणे' कशाला म्हणतात
त्यातून सुटण्यासाठी मग धडपडतात!

(७०) (स)
एक बाब अशी आहे
आधीच ती रुकार घेते
मग मात्र दिमाख दाखविते
ओळखा तीन अक्षरी शब्द कोणता ते?

(७१) (न)
एक शब्द घेता वृक्ष जाणता
दुजा लागता का तावातावाने बोलता?
शब्द आहे चार अक्षरी
ओळखा तो तुम्ही सत्वरी?

(७२) (द)
डाव आहे शब्दात
अशक्तपणाचा भाव त्यात
कमजोर होणेचा आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द

(७३) (द)
रूप शब्दात असूनही
सौंदर्य द्योतक मात्र त्यात नाही!
अंती ऋषी दर्शक आहे शब्द
ओळखा तो टाकाऊ अर्थी शब्द?

(७४) (द)
'वळ' एका शब्दात असूनही
माराची खूण मात्र त्यात नाही!
पाणी स्वच्छ होणे संबंधीचा शब्द
ओळखा तो चार अक्षरी शब्द

(७५) (द)

शब्दात असूनही भेद
गाळवया लागतो स्वेद
अंती दिवस मोजावे
इच्छुक स्पर्धक योजावे !!

(७६) (प)

एक 'रस' असा आहे की
आधी चुरचुरीत देता फोडणी
अटीतटीचा येतो त्याला वास
ओळखा तो तीन अक्षरी शब्द खास

(७७) (दु)

निम्मे घेता, मोटार आहे
निम्मे घेता, अंश आहे
सबंध घेता खाली बसता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता ?

(७८) (पा)

अद्याक्षराविना भरड पीठ आहे
मध्याक्षराविना खवा आहे
ठोक देता अंत्याक्षर नसता
संगीतातला राग ओळखा आता

(७९) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा !
संकट मुक्तीचा धावा आहे
तीन अक्षरी शब्द काय आहे ?

(८०) (पा)
शिर नसता, गेलेला म्हणता
पोट नसता, मान देता
'ग'ची बाधा आहे पोट धरता
रांगेत बसून का मग जेवता?

(८१) (पा)
शिर नसता, नम्रता आहे
पोट नसता, डौल आहे
पांघरूण पांघरतात, नसता पाय
कुलीन अर्थी शब्द आहे काय?

(८२) (स)
एक बाळ असे आहे
सुरूला 'आ' पसरते
आणि हेळसांड झाली म्हणते
ओळखा शब्द कोणता ते?

(८३) (न)
'कच' म्हणजे केस म्हणता
दुजा लागताच का कावता?
'च'च चा सुस्कारा न सोडता
ओळखा शब्द आहे कोणता?

(८४) (द)
'लांज' एका शब्दात असूनही
लज्जेचा शब्द तो नाही
त्यजणे अर्थी आहे तो शब्द
ओळखा तो चार अक्षरी शब्द?

(८५) (द)
'भिजा' एका ब्दात असूनही
भिजत मात्र कोणी नाही
जन्मजात गुणाचा आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द ?

(८६) (द)
'रडू' एका ब्दात असूनही
अश्रुपात मात्र त्यात नाही
वळून मग कशाला बघता
चार अक्षरी शब्द ओळखा

(८७)
'जीत' एका शब्दात असूनही
जय अर्थी मात्र तो नाही
आरंभी टवटवीतपणा दिसून येतो
ओळखा पाच अक्षरी शब्द कोणता आहे तो ?

(८८) (प)
'कार'चा अर्थ त्रास असा होतो
बकरी खाने तो वाढत जातो
व्यक्ती असते नोकरी हीन
ओळखा शब्दातील अक्षरे तीन

(८९) (दु)
निम्मे घेता दीप आहे
निम्मे घेता, हात आहे
सूर्य आहे सबंध घेता
ओळखा शब्द आहे कोणता ?

(९०) (दु)

निम्मे घेता, विहीर आहे
निम्मे घेता, राकट आहे
सबंध घेता द्राड आहे
ओळखा चार अक्षरी शब्द कोणता आहे?

(९१) (ति)

दार नसता, दिसते गाय
दार असता, नाही दिसत गाय!
सबंध घेता, होते आडनाव
ओळखा पाच अक्षरी ते आडनाव?

(९२) (पा)

शिर नसता ठोक देता
पोट नसता, देव आठवता?
नाव आहे नसता पाय
अंदाजाचा शब्द आहे काय?

(९३) (पा)

शिर नसता, आहे कलिका
पोट नसता, चपाती बरं का!
तीन अक्षरी आहे शब्द
ओळखा निर्वात दर्शक शब्द

(९४) (च)

उलट सुलट वाचला जरी
अर्थ बदलत नाही तरी
वाढत्या प्रशंसेचा आहे शब्द
ओळखा शब्द बसू नका स्तब्ध?

(९५) (स)

रड अशी आहे की
बकरी रवाने ती नाहीशी होते
दरवडेखोर अर्थी शब्द आहे
तीन अक्षरी शब्द काय आहे

(९६) (सा)

शब्दाअंती पाहून "खाऊ"
घ्याया हात नका पसरू
शब्दात दिमाख दिसतो खूप
परी त्यातला नकलीपणा पाहून बसाल चूप

(९७) (न)

मधे गाय ठेऊन बसलेत मामा
अंती आहे 'ग' ची बाधा
पाठोपाठ अर्थी आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द ?

(९८) (द)

'लप' एका शब्दात असूनही
लपंडावाचा खेळ मात्र त्यात नाही
लपंडाव खेळण्याचे ते वय मात्र आहे
ओळखा चार अक्षरी शब्द काय आहे ?

(९९) (द)

'मल' एका शब्दात असूनही
घाण मात्र त्यात नाही
त्याला येतो धुंद धुंद सुवास
ओळखा शब्दाचा मंद मंद वास

(१००) (प)

कर एका शब्दात असूनही
हात वा खंडणी दर्शक तो नाही
पोटभर जेवणाची दाद देतो
ओळखा शब्द कोणता तो ?

(१०१) (स)

'वग' शब्दात असूनही
तमाशातला मात्र नाही
निराळेपणा त्यात मात्र आहे
वेगळेपणाचा शब्द काय आहे ?

(१०२) (पा)

अद्याक्षराविना रान म्हणता
मध्याक्षराविना पर्ण जाणता
अंत्याक्षराविना 'चतकोर'चा शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द

(१०३) (द)

'टांग' एका शब्दात असूनही
ती प्राण्याची मात्र नाही
'ग'ची बाधा सुरुला होता,
पोहोण्याशी संबंधीत शब्द ओळखा

(१०४) (द)

'राख' आहे एका शब्दात
त्यातूनच उगवतात शब्दांचे हात
अंती आहे छोट्या दगडांचा शब्द
ओळखा तो चार अक्षरी शब्द

(१०५) (द)

'श्रम' शब्द तुम्ही ऐकता
प्रारंभीच 'आ' का वासता
श्रम करून गाळता घाम
मिळेल तुम्हा राहण्यास धाम

(१०६) (द)

कंद आहे एका शब्दात
फळातला नसून, आहे तो वेळात!
पळभरही नाही तो विसावा घेत
क्षण तो गेला, नाही परत येत

(१०७) (द)

'काका' एका शब्दात असूनही
चुलता मात्र त्यात नाही
अंती त्रास मात्र होतो फार
समीक्षकाच्या शब्दात अक्षरे आहेत चार

(१०८) (पा)

अद्याक्षराविना शुष्क जाणा
मध्याक्षराविना स्त्रियांचा दागिना
अंत्याक्षराविना मुलाचे नाव आहे
तीन अक्षरी शब्द काय आहे

(१०९) (द)

काळ एका शब्दात आहे
प्रारंभी मांजर टपून आहे
भ्रष्टाचार सर्वत्र माजला आहे
अशा अर्थी शब्द काय आहे?

(११०) (दु)

'मार' नसताही ठोक देतो
मार असताही ठोक बसतो
सबंध घेताही ठोक बसतो
ओळखा चार अक्षरी शब्द तो.

(१११) (द)

'दल' एका शब्दात असूनही
सैनिक दल मात्र त्यात नाही!
नाण्याचा दबका आवाज आहे सुरुला
'पालटणे' मग म्हणतात कशाला?

(११२) (पा)

शिर नसता घाण दिसते
पोट नसता बांगडी असते
कीस अर्थी शब्द नसता पाय
चिरडणारा शब्द आहे काय??

(११३) (दु)

निम्मी अक्षरे म्हणतात खर
शब्दार्थाशी मात्र जुळेना स्वर!
युद्धस्थानासाठी निम्मी अक्षरं
शब्द पूर्ण घाली प्रेमाची पाखर!

(११४) (पा)

काप म्हणता, शिर नसता
आडातली पखाल, पोट नसता
संधी मिळते नसता पाय
बेबंद अर्थी शब्द आहे काय?

(११५) (द)

राजी शब्दात असूनही
खुशी मात्र त्यात नाही
अंती विजय अर्थी जरी शब्द आहे
सबंध घेता मात्र हार आहे

(११६) (प)

हत्ती असून एका शब्दात
हरिणही आहे जोडीने त्यात
अंती असूनही शब्द पाण्याचा
करतो तो आभास मात्र पाण्याचा

(११७) (दु)

निम्मे घेता, विहिर आहे
निम्मे घेता, नदी आहे
हेक्टं आहे, सबंध घेता
ओळखा शब्द, आहे कोणता?

(११८) (स)

'पाणी' सुरुवातीला असूनही
आणि अर्थी शब्द आहे शब्दा अंती
सबंध घेता शांतता नि:शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द?

(११९) (दु)

पूर्वार्धात आहे जमीन
उत्तरार्धात मुलगा छान!
सबंध घेता, शेतकरी जाणा
चार अक्षरी शब्द ओळखाना

(१२०) (द्च)

निम्मे घेता, दगड छोटा
निम्मे घेता म्हणता मोठा
सबंध घेता, तुम्ही भांडता
भांडखोर शब्द ओळखा कोणता?

(१२१) (द)

'दाह' एका ब्दात असूनही
जळजळ मात्र त्यात नाही
अंती युद्धाचा आहे शब्द
ओळखा नमुना अर्थी तो शब्द?

(१२२) (प)

जरी तळ अंती दिसतो
तरीही प्रश्न आधी पडतो
सपाट खडकाचा आहे शब्द
ओळखा तीन अक्षरी तो शब्द?

(१२३) (न)

एक चट म्हणजे 'सारे' आहे हो
दुजा लागताच घाईत जा हो
चार अक्षरी आहे तो शब्द
ओळखा तो बसू नका स्तब्ध?

(१२४) (प)

राडा तसा घाणच असतो
कोणालाही नकोसा करतो
होता ग ची बाधा सुरूला
पडतो वेढा सभोवताला

(१२५) (द)

शब्दात अडकून बसलाय "वांधा"
दाखवी मुसळधार पावसाची बाधा
अंती शस्त्राची तीव्रता जोखता
येतो का चाराक्षरी शब्द ओळखता?

(१२६) (दु)

निम्मे घेऊन नावेत बसता
निम्मे घेऊन डोळ्याने पाहता
सबंध घेऊन जलतरण करता
ओळखा पाच अक्षरी शब्द कोणता?

(१२७) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा!
धावणाऱ्या स्वयंचलित यानाचा शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द

(१२८) (स)

एक बाब अशी आहे
आधी 'रु'कार घेऊन, अंती उघडते दार
देखणेपणाचा आहे तो शब्द
ओळखा पाच अक्षरी शब्द?

(१२९) (द)

एका शब्दात बसलेत सासू सून
'आ' का वासता त्यांना तसे पाहून
अंती 'न'कार चा शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द

(१३०) (दु)

निम्मे घेऊन घाव म्हणता
निम्मे घेऊन मार्ग शोधता
सबंध घेऊन निसटण्याचा मार्ग काढता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता

(१३१) (द)

पसंत असूनही एका शब्दात
मना जोगता नाही असे म्हणता
अंती संत असूनही, अमान्य ते का करता?
नावड दखविणारा चार अक्षरी शब्द कोणता?

(१३२) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा
जगप्रसिद्ध धबधब्याचे आहे स्थान
ओळखा शब्द नीट देऊन ध्यान!!

(१३३) (द)

'जेल' एका शब्दात असूनही
तुरुंग मात्र त्यात नाही
अंती दरवाजादर्शक आहे शब्द
ओळखा टवटवीतपणाचा शब्द!!

(१३४) (दु)

निम्मे घेता, झोप पळते
निम्मे घेता, युद्ध माजते
सबंध घेता, झोपेचे खोबरे होते
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता ते!!

(१३५) (द)

‘कली’ असूनही एका शब्दात
भांडण नाही असे म्हणतात!
बनावटपणा पाहून होतात क्षुब्ध
ओळखा तीन अक्षरी बेंगडी शब्द!!

(१३६) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा
‘ओ’चा साद घालणारे गाव
ओळखा अमेरिकन शहराचे नाव

(१३७) (दु)

निम्मे घेता, डोके होय
निम्मे घेता, गेरू होय
सबंध घेता, घुसता काय
चार अक्षरी शब्द ओळखा काय!!

(१३८) (द)

‘गारा’ असूनही एका शब्दात
हिमकण नाही असे म्हणतात
सुरूला नकार असूनही उगाच का बडवता।
ढोल पिटून सारे गाव जागवता

(१३९) (च)

सुलट वाचता, कामाची पिळवणूक
उलट वाचता, जाता गहिवरून!
शब्द आहे चार अक्षरी
ओळखा तो तुम्ही सत्वरी!!

(१४०) (द)

ठाव अेका शब्दात असूनही
ठिकाण मात्र त्यात नाही
सुरुला जठर दर्शक आहे शब्द
ओळखा चार अक्षरी आडनावाचा शब्द!

(१४१) (द)

चार अक्षरी शब्दातली घेऊन 'घडी'
वर्षाराणीने मारताच दडी!
छत्री नि रेनकोटची घालून घडी
उकला चार अक्षरी शब्दातली कोंडी?

(१४२) (दु)

निम्मे घेऊन, पापा घेता
निम्मे घेऊन, पीडा म्हणता
सबंध घेऊन, दोन हात करता
चार अक्षरी शब्द आहे कोणता?

(१४३) (दु)

निम्मे घेता, स्तर आहे
निम्मे घेता फाक आहे
सबंध घेता, घाबरून जाता
चार अक्षरी शब्द ओळखा आता!!

(१४४) (द)

कली असल्याने एका शब्दात
म्हणून का तुम्ही भांडत बसता?
बेगडी दर्शक आहे शब्द
ओळखू येतो का आता शब्द??

(१४५) (पा)

शिर नसता, किल्ला म्हणता
पोट नसता, ओता म्हणता!
बोला म्हणता, नसता पाय
तीन अक्षरी आहे काय??

(१४६) (द)

'वसा' एका शब्दात असूनही
धार्मिक कहाणीतला मात्र नाही
अंती छोटा अर्थी आहे शब्द
ओळखा हिंमतीचा शब्द

(१४७) (द)

'पळ' एका ब्दात असूनही
धावणे मात्र त्यात नाही
सुरुला होकार असूनही
भाजणे मात्र साह्त नाही.

(१४८) (पा)

पैसा दिसतो शिर नसता
घोण दिसते पोट नसता
शिरावर आहे गाय
वखारीला म्हणतात काय?

(१४९) (द)

रंभा एका शब्दात असूनही
अप्सरा मात्र त्यात नाही
अंती बोजा असताना
जेवढ्यास तेवढे कसे मागता

(१५०) (द)

'मामा' बसलेत एका शब्दात
तीन मुलींच्या नावांच्या घोळात
सर्व नावे घेता आहे नामवंत स्त्रीचे नाव
ओळखा ते सुप्रसिद्ध नाव ?

(१५१) (दु)

निम्मे घेऊन, सर्प म्हणता
निम्मे घेऊन, जिना चढता
सबंध घेऊन पोरखेळ म्हणता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता ?

(१५२) (द)

वाई एका शब्दात असूनही
गावाचे नाव त्यात नाही
प्रारंभी केव्हा दर्शक आहे शब्द
व्यायाम प्रकाराचा ओळखा शब्द

(१५३) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा
बांबूदर्शक शब्द आहे
तीन अक्षरी शब्द काय आहे ?

(१५४) (द)

नफा शब्दात असूनही
लाभ मात्र त्याने होत नाही
सुरूला कान का धरता
कायमचं बदनाम का होता !

(१४५) (पा)

शिर नसता, किल्ला म्हणता
पोट नसता, ओता म्हणता!
बोला म्हणता, नसता पाय
तीन अक्षरी आहे काय??

(१४६) (द)

'वसा' एका शब्दात असूनही
धार्मिक कहाणीतला मात्र नाही
अंती छोटा अर्थी आहे शब्द
ओळखा हिंमतीचा शब्द

(१४७) (द)

'पळ' एका ब्दात असूनही
धावणे मात्र त्यात नाही
सुरुला होकार असूनही
भाजणे मात्र साह्त नाही.

(१४८) (पा)

पैसा दिसतो शिर नसता
घोण दिसते पोट नसता
शिरावर आहे गाय
वखारीला म्हणतात काय?

(१४९) (द)

रंभा एका शब्दात असूनही
अप्सरा मात्र त्यात नाही
अंती बोजा असताना
जेवढ्यास तेवढे कसे मागता

(१५०) (द)

'मामा' बसलेत एका शब्दात
तीन मुलींच्या नावांच्या घोळात
सर्व नावे घेता आहे नामवंत स्त्रीचे नाव
ओळखा ते सुप्रसिद्ध नाव?

(१५१) (दु)

निम्मे घेऊन, सर्प म्हणता
निम्मे घेऊन, जिना चढता
सबंध घेऊन पोरखेळ म्हणता
चार अक्षरी शब्द ओळखा कोणता?

(१५२) (द)

वाई एका शब्दात असूनही
गावाचे नाव त्यात नाही
प्रारंभी केव्हा दर्शक आहे शब्द
व्यायाम प्रकाराचा ओळखा शब्द

(१५३) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा
बांबूदर्शक शब्द आहे
तीन अक्षरी शब्द काय आहे?

(१५४) (द)

नफा शब्दात असूनही
लाभ मात्र त्याने होत नाही
सुरूला कान का धरता
कायमचं बदनाम का होता!

(१५५) (द)

'मूद' शब्दात असूनही
ती भाताची मात्र नाही
'मूद' असूनही नाही का म्हणता
आणि टिपून ठेवा असे का म्हणता?

(१५६) (च)

उलट सुलट वाचले तरीही तेच
पुढील वाक्यातील उलगडा पेच
नारायण रावांचा अंतीम आक्रोश आहे
सात अक्षरी वाक्य काय आहे

(१५७) (द)

ताबा असूनही या शब्दात
का म्हणता हा नाही ताब्यात
अंती पंचम स्तंभी उभा आहे
पाच अक्षरी शब्द काय आहे?

(१५८) (दु)

निम्मे घेता, मौन धरता
निम्मे घेता, श्वास का रोखता?
सबंध घेता, कार्यसाधक अधिकारी आहे,
दोन अर्थी शब्द काय आहे

(१५९) (च)

उलट सुलट वाचले जरी
अर्थ बदलत नाही तरी
वृद्धिंगत पावणारा आहे शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द

(१६०) (पा)
शिर नसता, मोठी टोपली म्हणता
पोट नसता, दुसरा अथवा उपरा म्हणता?
बघा म्हणता, नसता पाय
टेहळणीचा शब्द आहे काय?

(१६१) (च)
उलट सुलट वाचले तरीही तेच
पुढील वाक्यातील उलगडा पेच
लग्न लागताच वाजविण्याचा इशारा द्या
सात अक्षरी वाक्य तुम्हीच शोधा?

(१६२) (द)
हानी शब्दात असूनही
नुकसानीची मात्र नाही
सत्यासत्याची बूज राखता
ओळखा चार अक्षरी शब्द आता

(१६३) (च)
उलट वाचता यातना घशाची
सुलट वाचता भूक पोटाची
उलट सुलट पहा वाचून
होईल तुमची खूप करमणूक

(१६४) (च)
उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून!
उलट पावसाच्या कोसळण्यात अस्वल कसे?
उलट 'जनी'मध्ये 'नीज' आहे तसे!!

(१६५) (च)

उलट सुलट वाचले जरी
अर्थ बदलत नाही तरी
बाक द्या अर्थी आहे शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द

(१६६) (द)

'हाज' या शब्दात असूनही
यात्रेसाठीचा मात्र तो नाही
प्रारंभी मोठा, अंती लोक दर्शक आहेत शब्द
ओळखा तो दोन अर्थी शब्द!

(१६७) (च)

अंत्याक्षर नसता, मुलीचे नाव
मध्याक्षर नसता, पूजता देव
अद्याक्षराविना देता ठोक
वेळ मर्यादेचा शोधा रोख!

(१६८) (द)

'दादा' बसलेत दोन शब्दांमध्ये
अंती खेड्याच्या अधिकाऱ्याचा शब्द आहे
प्रारंभी आहे ऋतु दर्शक नाव
ओळखा आठ अक्षरी सुप्रसिद्ध नाव!

(१६९) (च)

उलट वाचता डळमळणे आहे
सुलट वाचता घरंगळणे आहे
उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल उत्तरं पाहून

(१७०) (द)
'वग' आहे चार अक्षरी शब्दात
तो पहाल नशीबाच्या तमाशात
अंती वेगमापक दर्शक शब्द
ओळखा नशीबाच्या वेगाचा शब्द

(१७१) (द)
'काकू' शब्दात असूनही
चुलतीचे नात त्यात नाही
घराणे दर्शक शब्द अंती आहे
दु:ख दर्शक शब्द काय आहे

(१७२) (द)
शब्दामध्ये जगा आहे
त्यात जगण्याचा मार्ग आहे
अंती थंडावा दर्शक आहे शब्द
ओळखा जगण्याची ऊब देणारा शब्द ?

(१७३) (द)
चक्की असूनही एका शब्दात
नाही असे का म्हणता
तीन अक्षरी आहे तो शब्द
ओळखा बदनामी करणारा शब्द

(१७४) (ति)
'शील'भ्रष्ट होता, साधना जमते
कठोर साधना' नसता, शील प्रगट होते
दोन्ही शब्द घेता, पूर्ण माहिती दर्शक आहे शब्द
ओळखा चार अक्षरी तो शब्द ?

(१७५) (द)

'दगा' शब्दात असूनही
धोका मात्र त्यात नाही
समूहगान दर्शक आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द?

(१७६) (द)

'मढे' शब्दामध्ये पडले असूनही
त्याचा प्रेत अर्थ होत नाही
प्रारंभी आहे नाद नगाऱ्याचा
ओळखा शब्द आडनावाचा

(१७७) (न)

एक 'शब्द' म्हणजे आहे घाण
दुजा लागताच पातळ तलम कापड छान!
शब्द आहे चार अक्षरी
ओळखा तो शब्द सत्वरी!

(१७८) (द)

'बघा' शब्दात असूनही
दशा मात्र पहावत नाही
उतरती कळादर्शक आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द?

(१७९) (पा)

पूर्वार्धात शिक्षा अर्थी शब्द
उत्तरार्धात वृक्षदर्शक शब्द
थाटाच्या मांडणीचा संबंध शब्द
ओळखा चार अक्षरांचा शब्द

(१८०) (च)

उलट सुलट वाचून पहा
अर्थ बदलत नाही पहा
'कमतरता' मात्र जाणवते खूप
ओळखा शब्द बसू नका चूप!!

(१८१) (चौ)

उलट-सुलट जरी वाचला
अर्थ काही नाही बदलला
इंग्लिश शब्द भ्रष्ट झाला
इंग्रज गेलेत तरी तो शब्द राहिला.

(१८२) (पा)

शिर नसता वस्त्र आहे
पोट नसता थाळी आहे
अंगातली कणकण, नसता पाय
तीन अक्षरी शब्द ओळखाल काय?

(१८३) (द)

मस्का आहे शब्दात
लोणी मात्र नाही त्यात
प्रारंभी नमनाचा आहे शब्द
ओळखा रामराम अर्थी शब्द

(१८४) (दु)

निम्मे घेऊन किल्ला म्हणता
निम्मे घेऊन भांडे म्हणता
सबंध घेऊन भरपूर म्हणता
चार अक्षरी शब्द ओळखा आता

(१८५) (द)

'नाद' शब्दात असूनही
ध्वनी मात्र त्यातून येत नाही
अंती दिसत असूनही 'किंमत'
का कमी करता आदराची किंमत?

(१८६) (पा)

सुरूला बसलेत वडील
पोट नसता कलंकित व्हाल
पिता आहे नसता पाय
आडनाव ओळखा आहे काय?

(१८७) (दु)

एक आडनाव पूर्वार्धात
दुसरे आहे उत्तरार्धात
सबंध घेऊन भीती दाखवता
पाच अक्षरी शब्द ओळखा आता

(१८८) (पा)

शिर नसता शरीर म्हणता
पोट नसता, लोक म्हणता!
गावाच नाव आहे नसता पाय
'सांभाळ'ला म्हणतात काय?

(१८९) (द)

'गदा' आहे एका शहरात
त्याची प्रचीती येते युद्धात!
शांततेच्या प्रस्तावाला दिली दाद
सापडले ते शहर पेटलेल्या युद्धात?

(१९०) (पा)

शिर नसता, मृत्यूदंड आहे
पोट नसता, वृक्षाभोवतीचा बांध आहे
तेलाचा प्रकार, नसता पाय
गरीब बिचाऱ्यांना म्हणतात काय?

(१९१) (चौ)

उलटसुलट वाचून पहा
शोभा त्यातून दिसेल पहा
'शोभेल असा' अर्थी आहे शब्द
ओळखा तीन अक्षरी तो शब्द

(१९२) (द)

पाढा शब्दात असूनही
गणितातला मात्र तो नाही,
पळवापळवीचा आहे शब्द,
चौर्यकर्माचा ओळखा शब्द

(१९३) (द)

'नवा' असूनही शब्दात,
ती सापडेल जुन्या पुराणात!
सीता, दमयंती, नलाच्या भोगात
ओळखा असा 'नवा' आहे कशात?

(१९४) (चौ)

उलट सुलट पाहता वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
छाप अर्थी शब्द उठवता
अंक बनतो पुन्हा उलटवता

(१९५) (चौ)

उलटसुलट वाचले तरी तेच,
पुढील वाक्यातील उलगडा पेच!
ज्ञानामृत देऊन उपकृत करावे
सात अक्षरी वाक्य काय असावे?

(१९६) (द)

चुलता चुलती आहेत एका शब्दात
गुंतलेत ते एकमेकांच्या पक्षात
बोलणारा पक्षी आहे सबंध घेता,
ओळखा चार अक्षरी शब्द आता

(१९७) (चो)

उलट सुलट वाचा कसाही
शोभून दिसतो म्हणाल तरीही
अनुरूपचा अर्थी आहे शब्द
ओळखा तीन अक्षरी शब्द

(१९८) (पा)

शिर नसता सरका म्हणता
पोट नसता ठीक म्हणता
पुरे म्हणता, नसता पाय
शहराचे नाव ओळखाल काय?

(१९९) (द)

चक्की आहे शब्दात,
अब्रूचे दळण दळतात त्यात!
सुरूला नकार असूनही
बेअब्रू व्हायची थांबत नाही!

(२००) (दु)

निम्मे घेता, प्राणी आहे
निम्मे घेता, आसन आहे
सबंध घेऊन, कापड म्हणता
कापडाचा प्रकार शोधा आता

(२०१) (दु)

पूर्वार्धात बरे चिंतता
उत्तरार्धात गुप्तता राखता
मनातली गोष्ट सांगणारा शब्द
ओळखा तो चार अक्षरी शब्द?

(२०२) (द)

'वधू' आहे एका शब्दात
आढळेल एका नाटकाच्या पात्रात!
'लग्नाची बेडी', नाटकाचे नाव
ओळखाल काय पात्राचे नाव?

(२०३) (पा)

शिर नसता, विष्णुपत्नी आहे
पोट नसता, मुलीचं नाव आहे
देव आहेत नसता पाय
अंजनाला म्हणतात काय?

(२०४) (द)

शब्दात 'गर' असूनही
फळातील मात्र नाही
अंती युद्धासाठी शब्द
ओळखा झोपेविनाचा शब्द!!

(२०५) (दु)

पूर्वार्धात असे श्वसनेंद्रिय
उत्तरार्धात दागिनाप्रिय
संपूर्ण शब्द पिकातला कीडा
अक्षरांचा चार शब्द जोडा!!

(२०६) (द)

'घळ' शब्दात असूनही
ती डोंगर दऱ्यातील मात्र नाही!
आढळेल ती जखमांच्या संदर्भात
आणि आढळेल सरकारी कामकाजात

(२०७) (चौ)

उलट सुलट वाचून पहा
काळजी वाढेल तुमची पहा!
विजय अर्थी शब्द वाचता उलट
क्षिती बाळगा अर्थी शब्द होतो प्रगट!

(२०८) (द)

जेल शब्दात असूनही
तुरुंगासाठीचा मात्र नाही!
अंती दरवाजा आहे उघडा
त्यातून टवटवीतपणाचा शिकाल धडा

(२०९) (दु)

आहे मलई निम्मे घेता
मनाचा ओढा, निम्मे घेता
वाहन आहे सबंध घेता
चार अक्षरी शब्द शोधा आता



[illegible]

(२१०) (द)

'गूळ' आहे एका शब्दात
वाहून नेणारे वाहन असे त्यात!
शिशूला चालण्या शिकवी पाहे
पंचाक्षरी साधन काय आहे

(२११) (द)

'रताळं' असूनही शब्दात
कंद मात्र नाही त्यात
सुरुला बसलेत महादेव स्तब्ध
ओळखा तो चार अक्षरी शब्द

(२१२) (चौ)

उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
गवळणीचे नाव उलटविता
तेलाचा प्रकार ओळखा आता

(२१३) (पा)

शिर नसता मुलीचं नाव आहे
पोट नसता घोडा आहे
गंध आहे नसता पाय
प्राण्यांच्या बछड्याला म्हणतात काय?

(२१४) (चौ)

उलट-सुलट पाहता वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
तीर्थक्षेत्राचे नाव वाचता उलट
यज्ञ अर्थी शब्द होतो प्रगट

(२१५) (द)

'रग' असूनही शब्दात
गलितगात्रता दिसते त्यात
अंती आहे भीड घालणारा शब्द
ओळखा चार अक्षरी तो शब्द

(२१६) (दु)

निम्मे घेऊन, गव्हाचे पीठ म्हणता
निम्मे घेऊन, मारझोड करता
सबंध घेऊन, जीव तोडून काम करता
चार अक्षरी शब्द ओळखा आता

(२१७) (चौ)

उलट सुलट वाचले तरी तेच
तीन अक्षरी शब्दातला सोडवा पेच
शब्दात विद्युलतेचा दिसेल खेळ
शोधा शब्द लावू नका वेळ

(२१८) (दु)

पूर्वार्धात घाण करता
उत्तरार्धात सूत धरता
'फिरकीचा खिळा'चा संबंध शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द

(२१९) (द)

'दमा' शब्दात असूनही
धाप लागण्याचा रोग मात्र नाही
क्रांतीकारांनी कारावास भोगलाय
त्या स्थानाचे नाव ओळखाल काय?

(२२०) (दु)

नामवंत स्त्री आहे निम्मे घेता
भारी वजनी माप आहे निम्मे घेता
चित्रलिखाण आहे सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा आता

(२२१) (दु)

निम्मे घेता, कोरा कागद आहे
निम्मे घेता, देणगी आहे
सबंध घेऊन खिडकीला लावता
चार अक्षरी शब्द ओळखा आता

(२२२) (द)

हारी आहे एका नावात
मिळेल ते अरबस्थानात
इंधन पुरवते जगाला
तोंड दिले त्याने युद्धाला !!

(२२३) (चौ)

उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
धुंदी अर्थी शब्द उलटा वाचता
रुबाब पार घालवून बसता

(२२४) (द)

उवरार्धात 'वास' असूनही
गंध मात्र येत नाही
पूर्वार्धात बगळा बसलेला
म्हणतो ही बडबड कशाला ??

(२२५) (चौ)

उलट सुलट पहा शब्द वाचून
गंमत वाटेल त्याचा अर्थ पाहून
हल्ल्याकरिता पवित्रा घेता
निरुपयोगी म्हणता तो उलटवता

(२२६) (द)

ढाका एका शब्दात असूनही
बांगलादेशची राजधानी नाही
अंती त्रासदायक शब्द असूनही
पुढावा घेण्याचा हव्यास सुटत नाही

(२२७) (द)

'फाळ' एका शब्दात असूनही
नांगरासाठीचा मात्र नाही
उसळणे दर्शक आहे शब्द
ओळखा चार अक्षरी शब्द

(२२८) (चौ)

उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
नेह्मी अर्थी शब्द वाचता उलट
बंगाली बाबूचे आडनाव होते प्रगट

(२२९) (द)

चव एका शब्दात असूनही
रुची मात्र त्यात नाही
पचवण्याचा आहे उद्योग
चार अक्षरी शब्दाचा ओळखा प्रयोग!

(२३०) (स)
दोन इंद्रिये आहेत शेजारी शेजारी
समक्ष दिसत असूनही परिणती दुर्लक्षतेची
पाहूनही लक्ष नाही असे भासवता
ओळखा चार अक्षरी शब्द आता

(२३१) (पा)
शिर नसता, गावाचे नाव घेता
पोट नसता, मजा मारता
माती होते नसता पाय
चांदीला म्हणतात काय?

(२३२) (द)
'वग' या शब्दात असूनही
तमाशातला मात्र तो नाही
अंती आहे प्रचंड प्राणी
ओळखील 'गाजावाजा' करीत कोणी

(२३३) (द)
'वर्तन' शब्दात असूनही
चालचलणूक असा अर्थ नाही
बदल अर्थाचा आहे शब्द
ओळखा पाच अक्षरी शब्द

(२३४) (पा)
शिर नसता, अंश उरतो
पोट नसता, प्रश्न होतो
दगडीकोळसा आहे नसता पाय
महाराष्ट्राच्या एका भागाला म्हणतात काय?

(२३५) (चौ)

उलट सुलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
बढया मारणे अर्थी शब्द वाचता उलट
कह्यात ठेवणे अर्थी शब्द होतो प्रगट

(२३६) (दु)

निम्मे घेता, आहे सरपटणारा प्राणी
निम्मे घेता आहे चारपायाचा प्राणी
सबंध घेता, मुंबईचा एक भाग आहे
ओळखा चार अक्षरी शब्द काय आहे?

(२३७) (चौ)

सुलट उलट पहा वाचून
गंमत वाटेल अर्थ पाहून
अभिनेता आला त्याचे कसब दाखवायला!
शब्द उलटवता आहे तो भारी वजनाला

(२३८) (दु)

देव आहे निम्मे घेता
चाकू आहे निम्मे घेता
स्फुरण चढते सबंध घेता
चार अक्षरी शब्द ओळखा आता

(२३९) (चौ)

उलट सुलट वाचून पहा
गंमत वाटेल अर्थ पाहून
त्रीदोषातील एक शब्द उलटा वाचता
नेटाने त्यावर भाकरी भाजता!

(२४०) (पा)

शिर नसता, कलिका म्हणता
पोट नसता, चपाती खाता
कुबड काढतो नसता पाय
वादळाशी संबंधीत शब्द काय?

(२४१) (दु)

पूर्वार्धात शस्त्र असे
उत्तरार्धात राघव दिसे
सबंध घेऊन तुम्ही समजता
कोकण भूमीचा जन्मदाता!!

(२४२) (चो)

उलट सुलटचा सांगा शब्द
सुलट वाचता दोन बोटे मापाचा शब्द
उलट वाचता पुत्र दर्शक शब्द
ओळखा दोन अक्षरी शब्द

(२४३) (पा)

शिर नसता विड्यात घालून खाता
पोट नसता, प्रकाशात झगमगता!
हिंदोळा आहे नसता पाय
'टेचात'ला म्हणतात काय?

(२४४) (द)

'खर' शब्दात असूनही
सत्यासाठी मात्र नाही!
अंती युद्धभूमीसाठीचा शब्द
शोधा 'फळाफुलांचा सडा'चा शब्द??

(२४५) (पा)

आद्याक्षराविना अभिप्राय देता
मध्याक्षराविना विख्यात खाता
अन्त्याक्षर नसता कार्य करता
शोधा आडनाव न विसरता

(२४६) (द)

'बर' शब्दात असूनही
ठीक मात्र वाटत नाही
अंती बटण लावूनही
तिरपीट उडायची थांबत नाही!!

(२४७) (स)

सुरुला मुलीचं नाव घेता
अंती हात तुम्ही दाखवता
या दोहोत बसलाय भीती दाखवणारा भाव
ओळखा चार अक्षरी मुलाचं नाव

(२४८) (चौ)

उलट सुलटचा शब्द शोधा
मित्र अर्थी शब्द वाचता उलट!
त्यातून वैशिष्ट्य प्रगटते कसे?
'मरा' उलट वाचता 'राम' होतो तसे!!

(२४९) (दु)

पूर्वार्धात उडवता टिंगल जरी
उत्तरार्धात भोगता फळे तरी
दोन्ही शब्द उच्चारले एका मागोमाग जरी
मिळते संरक्षण निसर्गाचे कवचापरी

(२५०) (द)

'रिता' शब्दात असूनही
रिकामे मात्र राहता येत नाही
निर्वाहासाठी करावी लागते खटपट
सांगा चार अक्षरी शब्द झटपट!!

(१) सजावट (२) पिकले पान (३) साजरा (४) रसना दे वदे नासार (५) जठरानल (६) गहिवर (७) टरफल (८) रोमहर्षक (९) उदाहरण (१०) आबाळ (११) कामना (१२) किंबहुना (१३) बेचिराख (१४) उठाठेव (१५) कानाडोळा (१६) निरसन (१७) वेगळा (१८) शहर (१९) सुखावह (२०) नकलाकार (२१) वळकटी (२२) गायरान (२३) काटक (२४) चकणा (२५) रगड (२६) काथ्याकूट (२७) खितपत (२८) विकलांग (२९) बटाटा कीस (३०) हातवारे (३१) गागणे (३२) मध्यम (३३) बदल (३४) डरकाळी (३५) ताशेरे (३६) हेलकावा (३७) कचरा (३८) मनगट (३९) कलकल (४०) पदोपदी (४१) फोलपट (४२) जनन (४३) कातरवेळ (४४) समरस (४५) रातराणी (४६) जाळपोळ (५४७) निराळा (४८) कोंबडी (४९) कानन (५०) अगाऊ (५१) धरणीकंप (५२) बडबड (५३) अजागळ (५४) वाखाणणी (५५) कवडसा (५६) सुधाकर (५५७) सामोसा (५८) कायम (५९) तरट (६०) हरहर (६१) मयुरासन (६२) आचरट (६३) अभिरूची (६४) सबनीस (६५) गाडीतळ (६६) चरण (६७) जतन (६८) सावध (६९) गुरफटणे (७०) रूबाब (७१) ताड ताड (५७२) रोडावणे (७३) निरूपयोगी (७४) निवळणे (७५) उमेदवार (७६) चुरस (७७) बसकण (७८) मारवा (७९) वाचवा (८०) पंगत (८१) शालीन (८२) आबाळ (८३) कचकच (८४) तिलांजली (८५) अभिजात (८६) मुरडून (८७) ताजीतवानी (८८) बेकार (८९) दिवाकर (९०) आडदांड (९१) गायकवाड (९२) सुमार (९३) पोकळी (९४) वाहवा (९५) बेरड (९६) दिखाऊ (९७) मागोमाग (९८) बालपण (९९) परिमल (१००) ढेकर (१०१) वावग (१०२) पावन (१०३) गटांगळी (१०४) बाराखडी (१०५) आश्रम (१०६) सेकंद (१०७) टीकाकार (१०८) वासुकी (१०९) बोकाळला (११०) मारहाण (१११) बदलणे (११२) चुराडा (११३) पखरण (११४) मोकाट (११५) पराजीत (११६) मृगजळ (११७) आडमुठा (११८) नीरव (११९) भूमीपुत्र (१२०) खडाजंगी (१२१) उदाहरण (१२२) कातळ (१२३) चटचट (१२४) गराडा (१२५) धुवांधार (१२६) नौकानयन (१२७) टोयाटो (१२८) रूबाबदार (१२९) आसासून (१३०) पळवाट (१३१) नापसंत (१३२) टोरांटो (१३३) तजेलदार (१३४) जागरण (१३५) नकली (१३६) ओहिओ (१३७) शिरकाव (१३८) नगारा (१३९) दगदग (१४०) कोठावळे (१४१)उघडीप (१४२) मुकाबला (१४३) थरकाप (१४४) नकली (१४५) सांगड (१४६) अवसान (१४७) होरपळणे (१४८) गोदाम (१४९) भारंभार (१५०) हेमामालिनी (१५१) सापशिडी (१५२) कवाईत (१५३) कळक (१५४) कानफाट्या (१५५) नमूद (१५६) "काका वाचवा काका"

(१५७) हाताबाहेर (१५८) मुकादम (१५९) वाढवा (१६०) पहारा (१६१) "वाजवा रे वाजवा" (१६२) शहानिशा (१६३) वखवख (१६४) सरी/रीस (१६५) वाकवा (१६६) महाजन (१६७) सुमार (१६८) वसंतदादा पाटील (१६९) गडगड (१७०) दैवगती (१७१) शोकाकूल (१७२) रोजगार (१७३) नाचक्की (१७४) तपशील (१७५) वृंदगान (१७६) ढमढेरे (१७७) मलमल (१७८) डबघाई (१७९) सजावट (१८०) वानवा (१८१) मह्रुम (१८२) तापट (१८३) नमस्कार (१८४) गडगंज (१८५) अनादर (१८६) बापट (१८७) बागुलबुवा (१८८) जतन (१८९) बगदाद (१९०) पामर (१९१) साजेसा (१९२) ढापाढापी (१९३) वनवास (१९४) ठसा/साठ (१९५) "विद्या सर्वांस द्यावि" (१९६) काकाकुवा (१९७) साजेसा (१९८) बसरा (१९९) नाचक्की (२००) मांजरपाट (२०१) हितगूज (२०२) अवधूत (२०३) सुरमा (२०४) जागरण (२०५) नाकतोडा (२०६) चिघळणे (२०७) मात/तमा (२०८) तजेलदार (२०९) सायकल (२१०) पांगूळगाडा (२११) हरताळ (२१२) राधा/धारा (२१३) वासरू (२१४) गया/याग (२१५) मरगळ (२१६) आटापिटा (२१७) तडित (२१८) मळसूत्र (२१९) अंदमान (२२०) रेखाटन (२२१) तावदान (२२२) बहारीन (२२३) नशा/शान (२२४) बकवास (२२५) दबा/बाद (२२६) पुढाकार (२२७) उफाळणे (२२८) सदा/दास (२२९) रिचवणे (२३०) कानाडोळा (२३१) रजत (२३२) गवगवा (२३३) परिवर्तन (२३४) कोकण (२३५) बाता/ताबा (२३६) नागपाडा (२३७) नट/टन (२३८) सुरसुरी (२३९) वात/तवा (२४०) पोकळी (२४१) परशुराम (२४२) तसू/सूत (२४३) झोकात (२४४) पखरण (२४५) कामत (२४६) घाबरगुंडी (२४७) सुधाकर (२४८) सखा/खास (२४९) टरफल (२५०) चरितार्थ

IRBK-0127326

IRBK-0127326